# राजर्षी शाहू छत्रपतींचे बहुजन उध्दारक निवडक जाहिरनामे व हुकूमनामे

**प्रा. डॉ. चंद्रकांत कुरणे** इतिहास विभाग प्रमुख, गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय,कोल्हापूर.
मोबा नं : 9834378915 व्हॉटस् ॲप नं. 9960994794 Email : chandrakant7166@gmail.com

**गोषवारा;**

सामान्य जनतेस सामाजिक न्याय मिळावा व न्यायासना समोर प्रत्येक व्यक्ती समान ठरावी म्हणून छ. शाहू महाराजांनी क्रांतीकारक निर्णय घेतले आहेत. छ. शाहू महाराज यांच्या सन 1894 ते 1922 या कालखंडाच्या प्रशासनातील जाहिरनामे हुकूमनामे इ. चे उतारे कोल्हापूर पुराभिलेखागारातील छ. शाहू महाराज ठराव बुक आणि करवीर सरकारच्या गॅझेट मधून घेतले आहेत.

कोल्हापूर संस्थानमधील विविध खात्यांकडून अनेक बाबींसंबंधी उदा. बदल्या, नेमणूका, नेमून दिलेली कामे इ. ठराव हुजूर ऑफिसकडे अभिप्रायासह पाठविले जात असत त्यानुसार स्वतः छ. शाहू महराज त्यावर मंजूर किंवा नामंजूर असा निर्णय घेत होते. शाहू राजा केवळ राजा नव्हता, केवळ छत्रपती नव्हता, केवळ समाजसुधारक नव्हता केवळ लोकनेता नव्हता तर इतिहासाला कलाटणी देणारा आणि एक नवा इतिहास घडविणारा महान समाजपुरुष होता.

राजर्षी छ. शाहू महाराजानी स्वतःच्या जिवास व राज्यास धोका पत्करुनही क्रांतीकारक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. प्रजेच्या हितार्थ त्यांनी धरणे उभारली कालव्यांची भव्य योजना हाती घेतली आणि सहकारी संस्था काढून ते हरित क्रांतीचे अग्रदूत ठरले. सामान्य जनतेस सामाजिक न्याय मिळावा व न्यायासनासमोर प्रत्येक व्यक्ती समान ठरावी म्हणून त्यांनी क्रांतीकारक आणि पुरोगामी निर्बंध करुन वरिष्ठवर्ग व कनिष्ठवर्ग यांच्यातील भेदभाव नष्ट केला त्यांनी दलितवर्गाची उन्नती करणे म्हणजेच देशोध्दार करणे होय, असे निर्भयपणे व नेटाने प्रतिपादन केले. राजर्षी छ. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सक्तीचे मोफत शिक्षण सुरु करुन महाराष्ट्रातील मागास व दलित वर्गाची मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला. सर्वात ऐतिहासिक महत्वाची गोष्ट म्हणजे छ. शाहूंनी दलिताची गुलामगिरी नष्ट करुन त्यांना सर्व महत्वाची मानवी हक्क दिले होय.

छ. शाहू महाराज यांच्या सन 1894 ते 1922 या कालखंडाच्या प्रशासनातील हे जाहीरनामे व हुकूमनामे इ. चे उतारे कोल्हापूर पुरालेखागारातील 'छ. शाहू महाराज ठराव बुक' आणि करवीर सरकारच्या गॅझेट मधून घेतले आहेत.

संस्थानच्या निरनिराळया खात्यांनी (मुलकी, न्याय, शाळा, पोलीस इ.) गॅझेट आणि ठराव बुकात प्रसिध्द केलेले जाहिरनामे अथवा हुकूमनामे हे हुजूर ऑफिसने म्हणजे खुद्द शाहू महाराजांनी मंजूर करुन त्यावर दिलेल्या आदेशांवर आधारित असल्याने त्या त्या खात्यांचे जाहिरनामे अथवा हुकूमनामे जरी खाते प्रमुखांच्या नावांनी प्रसिध्द झाले असले तरी ते छ. शाहू महाराजांचे आहेत.

संस्थानमधील विविध खात्यांकडून अनेक बाबीसंबंधी उदा. बदल्या, नेमणूका, नेमून दिलेली कामे इ. ठराव हुजूर ऑफिसकडे अभिप्रायासह पाठविले जात असत. तेथे स्वतः शाहू महाराज हे ठराव मंजूर अथवा नामंजूर करीत नंतर मंजूर झालेले ठराव आदेशाच्या रुपाने संबंधित खात्याकडे नंतर पाठविला जात असे आणि मग संबंधित खाते हा आदेश सरकारी गॅझेट मध्ये प्रकाशित करीत असे. अनेकदा महाराजच संबंधित खात्यास आवश्यक स्वरुपात गॅझेटमध्ये प्रसिध्द होई.

कोल्हापूर पुरालेखागारात (State Record Office) हुजूर ऑफिसमधील मूळ ठरावांची नोंदबुके वर्षानुक्रमाने उपलब्ध आहेत. या नोंद बुकात Serial No. रोज नंबर, Date of Receipt दाखल तारीख, Minor Depart पोट खाते Subject Matter आले कामातील तात्पर्य, Date of Final Order निकाल तारीख Final Order निकाल हुकूम असे रकाने असून प्रत्येक ठराव मंजूर, नामंजूर केल्याच्या निकाल हुकूमाखाली महाराजांनी 'शाहू छत्रपती' अशी मोडी लिपीमध्ये सही आहे.

प्रस्तुत लेखामध्ये करवीर सरकारच्या गॅझेटमधील आणि ठराव बुकातील उतारे दिले आहेत. त्यातील बरेच जाहीरनामे व हुकूमनामे दलितोध्दारासाठी महत्वाचे आहेत. अनेकांतून महाराजांची आपल्या प्रजेच्या कल्याणाविषयीची तळमळ व्यक्त होते. अनेकातून त्यांची पुरोगामी दृष्टी व समाजसुधारणेविषयीची कल्पकता दिसून येते.

**राजर्षी शाहू महाराजांनी दलितोध्दारासाठी काढलेले जाहीरनामे व हुकूमनामे**

सन 1894 साली शाहू महाराजांनी आपल्या राज्यारोहण प्रसंगी आपल्या प्रजाजनांस उद्देशून काढलेला हा जाहीरनामा यात प्रजेच्या कल्याणाची व भरभराटीची 'उत्कट इच्छा' व्यक्त केली गेली आहे.

**जाहीरनामा**

ह्या जाहीरनाम्याच्या व्दारे कोल्हापूर इलाख्यातील आमच्या तमाम प्रजननांस जाहीर करण्यात येते की, आजपर्यंत आम्ही अल्पवयी असल्या कारणाने कोल्हापूर संस्थानचा कारभार ''कौन्सिल ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन'' यांच्या हातून चालविण्यात येत होता. परंतु आम्ही आता प्रौढावस्थेत आल्या कारणाने आज रोजी त्याची कारकिर्द संपून आपल्या राज्याच्या पुर्ण अखत्यार आमच्या हाती आला आहे. व त्याप्रमाणे आम्ही आज म्हणजे तारीख 2 माहे एप्रिल इसवी सन एक हजार आठशे चौऱ्यांण्णव पासून ते चालविण्यास सुरुवात केली आहे.

आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी. तिचे कल्याणाची सतत वृध्दी व्हावी व आमचे संस्थानची हरएक प्रकार सदोदित भरभराट होत जावी अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहान थोर जहागिरदार आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदीकरुन तमाम प्रजाजन शुध्द अंतकरणापासून मोठ्या राजनिष्ठेने

आम्हास सहाय्य करतील अशी आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची कारकिर्द दिर्घ कालपर्यंत चालवून सफल करावी, अशी मी त्या जगन्नियत्या परमात्म्याची एक भावे प्रार्थना करितो.[1]

❖ व्दारकू बिनकाळू चांभार स्कूल मास्तर शहर करवीर चांभार शाळास बढती 2 रुपये देणेबद्दल निकाल – ता. 17/12/1898
निकाल हुकूम – पन्नास रुपये प्रमाणे दोन रुपये सदरहू चांभार यास देण्याचे मंजूर केले.[2]

❖ वडगांव येथे महार मागांची शाळा सुरु करणेबद्दल 7 रुपये पगार व सादिलवार अशी दरमहा मंजूरी मिळावी.
निकाल – ता. 17/05/1901
निकाल हुकूम – सदरी लिहिले प्रमाणे शाळा सुरु करणेसाठी दरमहा आठ रुपये मंजूर केले आहे.[3]

❖ भाऊ मरगू महार वडणगे टेक्नीकल स्कूल मध्ये ड्रॉईंग शिकणेस समक्ष आज्ञा झाली पण नियमाप्रमाणे घेता येत नाही. स्पेशल केस समजणेची की कसे म्हणून विचारतात.
निकाल ता. 12/02/1901
निकाल हुकूम – स्पेशल केस समजून अर्जदारास घेऊन स्टायपेंड देण्याची वगैरे तजवीज व्हावी.[4]

❖ अडूरचे महार व कुलकर्णी यांचे दरम्यान बैत्याबद्दल बोलणे चाले हुजूर स्वारी समक्ष त्यावेळी कुलकर्णी बेपर्वा वागला म्हणून तो सस्पेंड झाला आहे.

सरसुमे – बाकी सर्व निकाल झाला पण अपशब्द बोलले बद्दल कुलकर्णी सस्पेंड आहे तो माफी मागतो सबब खुली करणे की कसे पसंती प्रमाणे हुकूम व्हावा.
निकाल ता. 01/06/1901
निकाल हुकूम – सदर इसमाचे सस्पेंडीचा हुकूम रद्द[5]

❖ खोची येथे ता. 31/03/1902 रोजी 2200 रुपये ची चोरी झाली चोरीचा सुगावा सांगणेवरुन धर्मा पांडू मांग, गोविंदा बाबाजी रामोशी या दोघांनी मेहनत घेऊन चोरीचा शोध लावला म्हणून त्यास सर्टिफिकेट देऊन पागोटी अगर कडी 10–10 रुपये किंमतीची.
निकाल हुकूम – स्पेशल पोलीस ऑफिसर यांचे अभिप्रायाप्रमाणे मंजूर केले आहे. सदरहू दोघांना बक्षीस पागोटी पाच – पाच रुपये द्यावे.[6]

**❖ कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकऱ्यात 50 टक्के जागा मागासवर्गीयांसाठी राखून ठेवणारा शाहू महाराजांचा इतिहास प्रसिध्द व अभूतपूर्व असा जाहीरनामा भारताच्या इतिहासातील राज्यकर्त्याने काढलेला अशा प्रकारचा पहिला जाहीरनामा होय.**
खाजगी खाते
तारीख – 28 जुलै 1902
यादी – रा. रा. नायब खाजगी कारभारी निसबत (गरज) सरकार करवीर यांजकडून

सध्या कोल्हापूर संस्थानमध्ये सर्व वर्णाच्या प्रजेस शिक्षण देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितीत सदर प्रयत्नास जितके यावे तितके यश आले नाही. हे पाहून सरकारास फार दिलगिरी वाटते.

ह्या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचारांनी असे ठरविले आहे की, यशाच्या अभावाचे खरे कारण उच्च प्रतीच्या शिक्षणास मोबदले पुरेसे विपूल दिले जात नाहीत.

ह्या गोष्टीस काही अशी तोड काढण्याकरिता उच्च प्रतीचे शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनापैकी मागासलेल्या वर्णांनी अभ्यास करावे म्हणून उत्तेजन दाखल आपल्या संस्थानच्या नोकरीचा आजपर्यंत चालू असल्यापेक्षा बराच मोठा भाग या लोकांकरिता निराळा राखून ठेवणे हे इष्ट होईल असे सरकारांनी ठरविले आहे.

ह्या रितीस अनुलक्षून महाराज सरकार असा हुकूम करितात की, हुकूम पोहोचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जाग्यापैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकांस भराव्या ज्या ऑफिसमध्ये मागसलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा पन्नास पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक त्या वर्षातील व्यक्तीची करावी.

ह्या हुकूमाच्या प्रसिध्दीनंतर केलेल्या सर्व नेमणूकांचे तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी सरकारकडे पाठवावे.
सुचना – मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राम्हण, प्रभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज करुन सर्व असा समजावा.[7]
हुजूर आज्ञेवरुन नागेश पांडूरंग भिडे खाजगी कारभारी

❖ कसबा सातवे खालसा गांव मुलकी पडीचा सर्व्हे नं. 246 या चांभार लोकांस वसाहती करिता घरे बांधण्यास फाळा 1 आणे 2 पैसे बसऊन मालकी लिलावाने देणे बद्दल चालले कामी सरसुभे यांचा अभिप्राय एकसाल आकारा इतका मालकी नजराण घेऊन जागा मालकी हक्काने देणे बद्दल.
निकाल ता. 26/03/1903
निकाल हुकूम – सरसुभे यांचे अभिप्रायाप्रमाणे होण्याचे मंजूर केले आहे.[8]

❖ सरसुभे नं. 1598/24/11/1903 शाहुपूरी नजीकचा मांग वाड्यातील लोकांस कौले, वासे, मेढी वगैरे घरावरील सामान देणे बद्दल समक्ष आज्ञा डिस्ट्रीक्ट ऑफिस उतरभाग यास झाले बद्दल.
निकाल : ता. 08/12/1903

निकाल हुकूम : डिस्ट्रीक्ट ऑफिस उत्तरभाग यांचे रिपोर्टप्रमाणे मंजूर केले आहे.[9]

❖ दिवाण 865/21–02–1904 कुंभोज महार मांगाची शाळा अनुभव पाहणेसाठी सरकारतर्फे 1 वर्ष करणेबद्दल.

निकाल ता. 12–03–1904

निकाल हुकूम – अनुभव पाहणेसाठी एकवर्ष पर्यंत मास्तर पगार 6 व सादिलवार 1 मिळून 7 रु. सदरी सवड दाखविले जागे प्रमाणे मंजूर केले आहे. एज्यूकेशन इन्स्पेक्टर यांनी लिहीणे प्रमाणे आशा रामा मिरा चांभार यांची नेमणूक व्हावी.[10]

❖ दिवाण नं. 1207/16–1–1904 मौजे कलनाकवाडी येथील अंबरनाक मांग यांची खालसा झालेली जमीन वाजवी फाळ्याने वारसाकडे वहिवट असल्यास ठेवावी म्हणून हुकूम झाला असता कमी फाळ्याने ठेवलेली आहे. हल्ली परशा मांग याजकडे वहिवाट आहे. तो लागण तोटा रुपये 352 भरुन पुढे 15 रु. आकार देण्यास कबूल नाही. सबब जमीन काढून घ्यावी म्हणून डिस्ट्रीक्ट ऑफिस दक्षिण भाग यांचा अभिप्राय जमिनीचा मगदूर (आकार) 17 रु. होतो.

निकाल ता. 16–04–1904

निकाल हुकूम – सदरहू जमिनीचा कब्जा घेऊन लावणी लिलाव करण्याचे मंजूर केले आहे[11]

**मूल्यमापन :–** राजर्षी छ. शाहू महाराजांच्या क्रांतीकारक अशा कारकीर्दीचा आजच्या युगात आपल्याला अनुभव घ्यावयाचा असेल तर त्यांच्या कार्याचा वारसा पुढे न्यायचा असेल तर छ. शाहू महाराजांच्या काळातील अस्सल कागदपत्रांचा आधार घ्यावा लागतो. ती अस्सल कागदपत्रे महाराजांच्या विचारांची त्यांच्या महत्वकांक्षेची ओळख करुन देण्यात आज फार मोलाची भूमिका बजावत आहेत.

**संदर्भसूची**

1) डॉ. पवार जयसिंगराव (संपा)राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,प्रकाशक – महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. व्दितीय आवृत्ती, 26 जून 2007 पृष्ठ क्रं. 939
2) कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस हुजूर ठराव बुक नं. 31 पृष्ठ क्रं. 175
3) ________________"____________________ नं. 40
4) ________________"____________________ नं. 40
5) ________________"____________________ नं. 42 पृष्ठ क्रं. 240
6) ________________"____________________ नं. 40पृष्ठ क्रं. 38
7) करवीर सरकारचे ग्याझिट – 2 ऑगस्ट 1902 भाग – 1 पृष्ठ क्रं. 182
8) कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस हुजूर ठराव बुक नं. 46 पृष्ठ क्रं. 289
9) ________________"____________________नं. 49 पृष्ठ क्रं 67
10) ________________"____________________ नं. 50पृष्ठ क्रं 166
11) ________________"____________________नं. 50 पृष्ठ क्रं 25